


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १५५ वा सोमवार दि. २८ जुलै २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांवर थेट फौजदारी कारवाईचे शासनाचे आदेश

## सरकारच्या आदेशामुळे बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेणाऱ्यांचे धाबे दणाणले

**जनसंचलन/बुलढाणा**

बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन दिव्यांगांचे लाभ उपटणाऱ्या उपटसुंभांना आता थेट फौजदारी कारवाईचा दणका देण्याच्या तयारीत राज्य शासन आलेले आहे. या कारवाईसंदर्भात शासनाने एक निर्णय घेतला असून, लवकरच त्याची अंमलबजावणी सुरू आहे. राज्यभरात बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन धडधाकट लोक लाभ उपटत असल्याचे समोर आल्यानंतर शासनाला जाग आली असून, या निर्णयामुळे बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेणाऱ्यांची आता खैर नाही. बुलढाणा जिल्ह्यातही बोगस प्रमाणपत्र घेऊन काम करणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांबाबत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने यापूर्वीच प्रकाश टाकलेला आहे. दैनिक जनसंचलनच्या हाती आलेल्या अधिकृत माहितीनुसार बुलढाणा जिल्हा परिषदेअंतर्गत तब्बल ५५५ शिक्षक हे बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन कार्यरत असल्याची खात्रिलायक माहिती आहे. तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांनी काही सामाजिक कार्यकर्ते व सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या दबावामुळे जिल्ह्यातील दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त शिक्षकांची इतर जिल्ह्यात चौकशी होऊन कारवाईस सुरुवात झाली. बुलडाणा जिल्हा परिषद शिक्षण

**बोगस दिव्यांग / अस्तिव्यंग प्रमाणपत्रावर पदोन्नती व विविध शासकीय लाभ घेणाऱ्या देशाचे भविष्य घडविणाऱ्या त्या शिक्षकांचे ५३२ + २३ = ५५५ बोगस प्रमाणपत्र धारकांची मिळालेल्या माहितीनुसार त्यांची ऑन केमेरा पडताळणी व्हावी करीता सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन प्रशासनाकडे पाठपुरावा करून पडदाफाश करणार असून खऱ्या दिव्यांगांना न्याय मिळवून देणार**

विभागात संतगतीने कागदोपत्री पत्र व्यवहार करून परत तपासणी करण्याचे फक्त आदेश दिले होते. यासंदर्भातील तपासणी ही मुंबईच्या जे.जे. हॉस्पीटलमध्ये करण्यासंदर्भातही त्यांनी बजावले होते.मात्र, गेल्या अनेक महिन्यांपासून यासंदर्भात कोणतीही अंमलबजावणी झालेली नाही. ही अंमलबजावणी होऊ नये, यासाठी जिल्हा परिषदेत मोठे लॉबिंग करण्यात आलेले आहे. कारवाई दाबून ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांशी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र धारकांनी अर्थपूर्ण सेटिंग केल्याची यामध्ये दाट शक्यता आहे. दिव्यांग प्रमाणपत्र घेतलेल्यांची परत तपासणी करावी, यासाठी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करीत आहे. बोगस दिव्यांग





प्रमाणपत्रांचा जिल्ह्यात बाजार मांडला गेला असून, याला प्रकाराला जिल्हा सामान्य रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराची चांगली जाडीभरडी किनार आहे. कारण दिव्यांग प्रमाणपत्र देणारी यंत्रणा देवाणघेवाण करून धडधाकट लोकांनाही प्रमाणपत्र वाटपाचे काम करते. अशाप्रकारे दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन अनेक धडधाकट शिक्षक व कर्मचारी बदल्या, पदोन्नती यांचे लाभ उपटत आहे. काही दिवसांपूर्वी मुंबई महानगरपालिकेच्या दोन कर्मचाऱ्यांकडे बोगस दिव्यांग प्रमाणपत्र आढळल्याचे तपासात समोर आले होते. त्यानंतर तात्काळ त्या कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले. याशिवाय विविध ठिकाणांहूनही बोगस दिव्यांग प्रमाणपत्र सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांची घेतल्याच समोर आलेले आहे. बुलढाण्यात हा आकडा फारच मोठा आहे. त्यामुळे या प्रकरणी किती मोठा भ्रष्टाचार झाला असेल, हे स्पष्टपणे दिसून येत आहे. परंतु आता यामध्ये राज्य शासनाने आता निर्देश दिल्यामुळे अशा बोगस दिव्यांगांवर कारवाई होण्याची शक्यता वाढली आहे. या प्रकारामुळे बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेणाऱ्यांमध्ये घबराट पसरली असून, अनेकांवर कारवाई होण्याची शक्यता आहे. जोपर्यंत बोगस दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई होत नाही तसेच त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल होत नाहीत, तोपर्यंत दैनिक जनसंचलन वसिटी न्यूज सातत्याने या भ्रष्टाचार व गैरप्रकाराविरोधात आवाज उठवत राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात

# दुय्यम निबंधक महेश दाभाडे यांची तडका फडकी बदली!

## कारण काय? भ्रष्टाचार की, अनागोंदी कारभार?

**जनसंचलन/ चिखली**


दुय्यम निबंधक कार्यालयातील दुय्यम निबंधक महेश दाभाडे यांची तडका फडकी बदली करण्यात आल्याने त्यांच्या भ्रष्टाचार आणि अनागोंदी कारभाराची चर्चा सुरू झाली आहे. दुय्यम निबंधक कार्यालये ही नोंदणी व मुद्रांक विभागांतर्गत कार्यरत असतात. यांचे कामकाज नोंदणी अधिनियम १९०८, महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१, आणि महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ नुसार चालते. या कार्यालयांद्वारे दस्त नोंदणी, प्रमाणित नकला देणे, आणि इतर सेवा पुरवल्या जातात. चिखली येथील कार्यालयही याच रचनेचा भाग आहे. परंतु, चिखलीच्या कार्यालयात या सेवांच्या नावाखाली नागरिकांची लूट होत असल्याची ओरड सुरू होती. याच पार्श्वभूमीवर, दुय्यम निबंधक महेश दाभाडे यांची तडकाफडकी बदली करण्यात आली असून, याबाबत परिसरात उलट-सुलट चर्चांना उधाण आले आहे. या कार्यालयातील कामकाजाच्या पद्धती आणि अनाधिकृत व्यक्तींकडून होणारी पैशाची मागणी यामुळे कार्यालयाची प्रतिष्ठा धुळीला मिळत असल्याचा आरोप केला जात आहे. शासकीय शुल्काचे दरपत्रक लावलेले नाही. याचा गैरफायदा घेत कार्यालयात अनधिकृतपणे काम करणारे काही व्यक्ती सामान्य नागरिकांकडून अवास्तव रकमेची मागणी करतात. विशेष म्हणजे, दस्तऐवज पूर्ण असतानाही नागरिकांना पैशाची मागणी केली जाते. या अनधिकृत व्यक्तींना कार्यालयातील अधिकृत कर्मचारीही विरोध करत नाहीत, कारण यातून मिळणारा पैसा सर्वांच्या खिशात वाटला जात असल्याची ही चर्चा आहे.



# व्याघ्रपर्यटनामागे वैज्ञानिक दृष्टिकोन असावा

## संपादकीय लेख

सन २०२२मध्ये झालेल्या व्याघ्रगणनेनुसार, राज्यात ४४४ तर देशात ३,६८२ वाघ होते. आता पुन्हा होणाऱ्या व्याघ्रगणनेत ही संख्या निश्चितपणे वाढलेली असेल. व्याघ्र प्रकल्पांबरोबरच अभयारण्ये आणि राखीव संवर्धनक्षेत्रांमध्येही वाघाचे अस्तित्व वाढले आहे. वस्तुतः व्याघ्रसंवर्धनाचा संबंध जंगलातील जलसंवर्धनाशी येतो. वाघ हा उत्तम पर्यावरणाचे शेवटचे टोक आणि प्रतीक आहे. देशभरात आणि राज्यात मागील ५० वर्षांत झालेल्या प्रयत्नांतून विविध अधिवासांत आणि परिस्थितींमध्ये वाघ तग धरू शकतो, हे सिद्ध झाले आहे. केवळ संरक्षित वनक्षेत्रांतच नव्हे, तर त्याबाहेरील जंगलांमध्येही वाघ आहे आणि त्यांच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने सरकारी पातळीवर धोरणात्मक विचार सुरू झाला आहे. अर्थात, काही प्रश्न अजूनही कायम आहेत. शावकांच्या मृत्यूंची संख्या कमी झाली आहे. वाघिणी आणि शावक एकत्र फिरताना अनेक जंगलांमध्ये दिसतात. मात्र, मध्यम वयाच्या आणि पूर्ण वाढ झालेल्या वाघांच्या शिकारींच्या घटना अलीकडच्या काळात वाढल्या आहेत. शिकारी गट पुन्हा एकदा सक्रिय झाले असल्याचे चित्र आहे. संरक्षित जंगलांच्या बाहेर ६० टक्के वाघ आहेत. शहराजवळ वाघ येण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. या पार्श्वभूमीवर संवर्धनाकडे आणखी व्यापक दृष्टीने बघण्याची गरज आहे. वाघांचे संरक्षण आणि संवर्धन करावयाचे असेल तर जंगलांच्या आजूबाजूच्या लोकांची मदत घेतल्याशिवाय ते शक्य होणार नाही, याची जाणीव आपल्याकडे ५० वर्षांपासून आहे. यादृष्टीने याआधीही बरेच प्रयत्न झाले आहेत आणि आजही सुरू आहेत. त्याचे ठिकठिकाणी चांगले परिणामही दिसून आले आहेत. मात्र, गेल्या काही वर्षांत लोकांचा सहभाग काही प्रमाणात कमी होत असल्याचे प्रत्यक्ष काम करताना लक्षात येते. पूर्वीच्या तुलनेत लोकांची वाघांबद्दल असलेली आस्था कमी झाली आहे. विशेषतः नव्या पिढीत हे नाते बरेच क्षीण झाले आहे. मानव-व्याघ्रसंघर्षाच्या घटनादेखील याला कारणीभूत आहेत. याशिवाय, स्थानिक स्तरावर राजकारण्यांचा वाढलेला हस्तक्षेपही लोकांमध्ये वाघाबद्दल राग निर्माण करण्यास कारणीभूत ठरला आहे. वाघ हा वाईटच आहे, असे चित्र ग्रामस्थांमध्ये निर्माण होते आहे. त्याचा फटका वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना आणि पर्यायाने व्याघ्रसंवर्धनाला बसतो आहे. सगळ्यांचा भर हा मृत्यूनंतरच्या भरपाईवर आहे. सध्याच्या घडीला मानवमृत्यू झाल्यास



२५ लाख रुपये रक्कम दिली जाते. ती वाढवून २ कोटी रुपये केली जावी, अशी मागणी आत्ताच सुरू झाली आहे. वाघ वाचवायला आणि त्यासाठीच्या प्रयत्नांना ग्रामस्थांचे पूर्वी मिळणारे सहकार्य आता कमी झाले आहे. मात्र, केवळ भरपाई रक्कम देऊन भागणार नाही. वाघ आणि माणूस यांचे सहअस्तित्व साधण्याचा दृष्टिकोनच या प्रश्नावर उत्तर आहे. वनविभाग, सरकार आणि इतर संबंधित संस्थांच्या प्रयत्नांमुळे मागील दहा-बारा वर्षांत टप्प्याटप्प्याने पर्यटन वाढत गेले आहे. वनविभागाला महसूल मिळणे, स्थानिकांना काही प्रमाणात रोजगार मिळणे यादृष्टीने पर्यटनाचा लाभ झाला आहे. मात्र, अलीकडच्या काळात अनियंत्रित पर्यटनाचे प्रमाण वाढले आहे. मुळात जंगल पर्यटनाला प्रारंभ झाला, त्याच्या मुळाशी जंगलव्यवस्थेबद्दल लोकशिक्षण व्हावे आणि लोकांच्या मनात आस्था निर्माण व्हावी हा होता. मात्र, आता कसेही करून वाघ बघणे, रिसॉर्टवर पार्टी करणे, डेस्टिनेशन वेडिंग यावरच जास्त भर आहे. स्थानिकांनी आपल्या जमिनी रिसॉर्टमालकांना विकल्या आणि तेथेच ते सुरक्षारक्षक म्हणून काम करीत असल्याचे चित्र आहे. रिसॉर्टचे प्राबल्य आणि संख्या वाढल्याने त्याचा परिणाम पर्यटनाच्या धोरणांवरही पडणे स्वाभाविक आहे. जंगलांमध्ये होणाऱ्या अनियंत्रित गर्दीवरून हे स्पष्ट होते. व्याघ्रपर्यटन असायलाच हवे. मात्र, त्यामागील दृष्टिकोन राजकीय न राहता वैज्ञानिक असावा, याची काळजी घ्यायला हवी.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४–२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००–३१३–२३२४

## टपाल खात्यात एजंटची भरती!

जनसंचलन/बुलडाणा

भारतीय डाक विभागामार्फत डाक जीवन विमा योजनेंतर्गत जिल्ह्यातील टपाल जीवन विमा योजनेसाठी थेट अभिकर्ता (एजंट) आणि क्षेत्र अधिकारी पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी १२ ऑगस्टला सकाळी ११ ते दुपारी २ वाजेदरम्यान आवश्यक कागदपत्रांसह मुलाखतीसाठी हजर राहावे, असे आवाहन डाकघर अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे. भरतीसाठी अर्जाचा नमुना बुलडाणा प्रधान डाकघर किंवा डाक अधीक्षक कार्यालय, बुलडाणा येथे उपलब्ध आहे. इच्छुक उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे असावे आणि शैक्षणिक पात्रता किमान दहावी उत्तीर्ण आवश्यक आहे.

CHANGE OF NAME

Name Change For Passport

MY OLD NAME IS SYED AYAN SYED SHAFEEQUE

NEW NAME IS

SYED AYYAN SYED SHAFIQUE

ADDRESS :- KAMELA ROAD IQBAL NAGAR TIPU SULTAN CHOWK BULDHANA, MAHARASTRA - 443001

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.

(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# जावयाला कुणी कडेवर उचलून नेऊन पार्टीत बसवलं का? गिरीश महाजनांचा खडसेंना टोला



**नाशिक:** रेव्ह पार्टी प्रकरणात अडकणार असल्याची कल्पना माजी मंत्री एकनाथ खडसे यांना होती, तर त्यांनी जावयाला सतर्क का केले नाही. जी कारवाई झाली ती खडसेंनी मान्य करायला हवी. रात्री कुणी उचलून नेऊन पार्टीच्या ठिकाणी बसवायला त्यांचा जावई लहान बाळ नाही, असा टोला जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी रविवारी (दि.२७) नाशिकमध्ये लगावला.एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांना कथित रेव्ह पार्टीत सहभागी असल्याबाबत पुण्यातून अटक करण्यात आल्याने खळबळ उडाली. ङ्कसध्या ज्या प्रकारचे वातावरण आहे त्यावरून असे काही घडू शकते, असा अंदाज मला अगोदरपासूनच होताफ, अशी प्रतिक्रिया खडसे यांनी व्यक्त करीत हे षडयंत्र असल्याचे सूतोवाच केले होते. खडसेंच्या या वक्तव्याचा समाचार महाजन यांनी घेतला. ङ्ककाही कारवाई झाली तर हे षडयंत्र असल्याचे बोलणे योग्य नाही. प्रत्येकवेळी षडयंत्र कसे असेल? खडसे यांना असा अंदाज होता तर त्यांनी जावयाला सावध करायला हवे होते. पोलिस तपासातून सर्व गोष्टी स्पष्ट होतीलफ, असे गिरीश महाजन म्हणाले. ङ्कराऊतांना मोकाट सोडलेफगिरीश महाजन नावाचा सांड मोकाट सुटला आहे. याला आवरले नाही, तर हा देवेंद्र फडणवीस यांनाही गाडल्याशिवाय राहणार नाही,फ अशी टीका शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केली होती. या टीकेलाही महाजन यांनी उत्तर दिले, की ङ्कमी काही राऊत यांना सांड म्हणणार नाही. त्यांना मोकाट सोडल्याने ते कुणाला काहीही बोलू शकतात. खडसे यांच्या जावयानेच या रेव्ह पार्टीचे आयोजन केले होते. त्यांच्या नावावरच तेथील रूम आरक्षित होती. तेथे अल्कोहोल, ड्रग्ज सेवन झाले आहे. रक्त नमुन्यांच्या अहवालातून ते स्पष्ट होईल. काही लोक संस्कृती नासविण्याचे काम करीत आहेत. त्यामध्ये खेवलकर आहेत. तेथे आढळलेल्या मुलींवर लैंगिक अत्याचार झाले आहेत का, हे तपासायला हवे. अंमली पदार्थांच्या व्यवहारांत खडसे यांच्या पैशांची गुंतवणूक झाली आहे का, हे तपासणे आवश्यक असून, यासाठी उच्चस्तरीय चौकशी समिती नेमावी,फ अशी मागणी चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण यांनी नाशिकमध्ये केली.एकनाथ खडसे यांच्या जावयाच्या अटकेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नागपुरात प्रतिक्रिया विचारली असता त्यांनी रेव्ह पार्टीची माहिती माध्यमांतूनच मिळाल्याचे सांगितले. माध्यमांत दिसले त्यावरून पुणे पोलिसांनी ही - पार्टी उधळून लावली. त्यावेळी काही ड्रग्ज सापडल्याचे कळते. - पोलिस अधिकाऱ्यांकडून पूर्ण माहिती घेतल्यानंतरच त्यावर अधिक बोलता येईल, असे मुख्यमंत्री म्हणालेजावई असो किंवा अन्य कुणी असो जर दोषी असेल तर शासन झाले पाहिजे. पण कुणाला अडकवण्याचा प्रयत्न करणार असाल तर ते सहन करणार नाही. त्याचा निश्चितपणे विरोध करू, अशा शब्दांत आमदार एकनाथ खडसे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. जर ती खरी रेव्ह पार्टी असेल व त्यात आमचे जावई गुन्हेगार असतील तर मी समर्थन करणार नाही. पण, पोलिस यंत्रणेने प्रामाणिकपणे तपास करावा, अशी अपेक्षा आहे, असे खडसे म्हणाले

## शिंदेंच्या मंत्र्यांना बदनाम करण्याचे कट कारस्थान सुरु, रामदास कदम यांनी उपस्थित केली शंका...



**रत्नागिरी :** महायुतीच्या सरकारमध्ये सध्या काही मंत्र्यांवर आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. त्यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेही मंत्री आहेत. आता याच विषयावरून शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी वेगळीच शंका व्यक्त केली आहे. फक्त आरोप करायचे आणि मंत्र्यांचे राजीनामे मागायचे हे कोणती पद्धत आहे? शिंदे साहेब याच्या खोलवर आपल्याला जावं लागेल, असं म्हणत मला एक संशय असा आहे की एकनाथ शिंदे यांच्या मंत्र्यांना बदनाम करण्याचं कटकारस्थान कुठे रचले जातेय की काय हा संशय देखील माझ्या मनामध्ये आहे. गोगावले यांच्यासारखा मी सुद्धा ओपन बोलणारा माणूस आहे. तेव्हा आपण या खोलामध्ये जाऊ. पण आमची ही संस्कृती नाही. जनसेवा हीच ईश्वर सेवा हे मानून आम्ही काम करतो आहोत, असं रामदास कदम म्हणाले. रामदास कदम यांचा विधानाचा रोख नेमका कोणाकडे होता? याची चर्चा आता रंगली आहे.याच विषयाला पुढे नेत त्यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि आमदार अनिल परब यांच्यावर निशाणा साधला. मागील वेळी झालेल्या नगरपंचायत निवडणुकीत आमदार शिवसेनेचा आणि राष्ट्रवादीच्या माजी आमदार संजय कदम यांच्या हातात एबी फॉर्म देतो. सगळं तालुकाध्यक्षांची हकालपट्टी करतो आणि आता योगेश कदम मंत्री झाल्यावर सभागृहात मंत्री म्हणून गेल्यापासून पहिल्या दिवसापासून खोटे नाटे आरोप करून त्यांचं एकच आहे की, राजीनामा दे राजीनामा दे अरे काय कोणाच्या अंगावर येता? कसला राजीनामा मागता? अरे नियमांमध्ये तरी बसते का? असा सवाल रामदास कदम यांनी उपस्थित केला. जगामधला असा एकमेव पक्षप्रमुख असेल, आपल्या तरुण आमदाराला आपणच संपवतोय, असा पहिला नेता कोण असेल तर तो उद्धव ठाकरे आणि त्याचे हे पिल्लू याच्या खांद्यावर ते बंदूक ठेवून चाप ओढतय, अशा शब्दात बोचरी टीका रामदास कदम यांनी अनिल परब आणि उद्धव ठाकरे यांच्यावर केली आहे.ङ्कङ्कहोय होय कोकण हा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा बालेकिल्ला आहे. तो भगव्या झेंड्याचा आहे आणि सगळं कोकण आज देखील शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं आहे. आणि भविष्य घेणाऱ्या निवडणुकांमध्येही सगळं कोकण शिवसेनेचेच राहणार येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा भगवा फडकणारङ्कङ्क, अशी ग्वाही रामदास कदम यांनी दिली.

## आता बस्स झालं, भाजप हाऊसफुल्ल ! संजय राऊतांचं नाव न घेता महाजनांचा खोचक टोला



**नाशिक:** नाशिकमध्ये काही लोक येऊन पोपटपंची करून निघून जातात. सकाळपासूनच त्यांच्या गर्जना सुरू होतात. परंतु, त्यांच्या पक्षात कुणी अध्यक्ष व्हायलाही तयार नाही. सुधाकर बडगुजरांपाठोपाठ त्यांनी महानगरप्रमुख केलेले मामा राजवाडेही भाजपत आले. आता त्यांनी गितेंना अध्यक्ष केले असले, तरी त्यांना आपल्याला भाजपमध्ये घ्यायचे नाही. आता बस्स झालं, भाजप हाउसफुल्ल झाला, असे सांगत जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी संजय राऊत यांचे नाव न घेता शिवसेना ठाकरे गटावर शरसंधान साधले.ठाकरे गटाचे माजी नेते सुनील बागूल, माजी महानगरप्रमुख मामा राजवाडे यांच्यासह त्यांच्या समर्थकांनी रविवारी महाजनांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. गंगापूररोडवरील रावसाहेब थोरात सभागृहात हा प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण, आमदार प्रा. देवयानी फरांदे, सीमा हिरे, राहुल ढिकले, भाजप शहराध्यक्ष सुनील केदार, जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव, माजी आमदार बाळासाहेब सानप, लक्ष्मण सावजी, माजी मंत्री बबनराव घोलप, भिकूबाई बागूल, सुधाकर बडगुजर आधी उपस्थित होते.महाजन म्हणाले, की देशात, राज्यात सर्वांचा ओघ भाजपकडे आहे. शिवसेना ठाकरे गटाने गितेंना महानगरप्रमुख केले आहे. तेही भाजपत आले असते, परंतु त्यांना घ्यायचे नाही, असे महाजन यांनी स्पष्ट केले. पक्षांतर्गत मतभेद बाजूला सारून महापालिका, जिल्हा परिषदेच्या निवडणुकांसाठी सज्ज व्हा. नाशिक महापालिकेत ११० जागा जिंकून राज्यात नवीन विक्रम प्रस्थापित करावा, असे आवाहन महाजन यांनी केले. शंभू बागूल, राजवाडे, भगवंत पाठक, गुलाब भोये, जगदीश अपसुंदे आदी ६० प्रमुख पदाधिकाऱ्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.भाजपमध्ये प्रवेश करणे सोपे राहिले नाही, असे बागुल यावेळी म्हणाले. पक्षप्रवेशासाठी महाजनांशी संपर्क साधला असता त्यांनी प्रथम पक्षाचे स्थानिक आमदार, पदाधिकारी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ना हरकत प्रमाणपत्र आहे का, अशी विचारणा केली. मी परवानगी घेऊन आल्याचे सांगितल्यानंतर हा प्रवेश झाला. त्यामुळे मला ङ्कएमपीएससीफची परीक्षा उत्तीर्ण झाल्यासारखे वाटत असल्याची भावना बागूल यांनी व्यक्त केली.


# मिशन मनपा : महापालिकेच्या तोंडावर राज मातोश्रीवर, युती निश्चित; उपराजधानीत ठाकरेंच्या शिवसेनेसमोर तीन आव्हानं कोणती?



नागपूर : प्रदीर्घ काळापासून युतीच्या भरवश्यावर खेळणाऱ्या शिवसेनेला यावेळी महापालिकेत शक्ती दाखवण्याची संधी चालून आलेली आहे. एकाच महानगर प्रमुखाचा नवा वाद सुरू झाला असला तरी, शिवसैनिक उत्साहात असून आज, रविवारी उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवशी मनसेचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांनी दिलेल्या शुभेच्छा म्हणजे दुग्धशर्करा योग असल्याची भावना व्यक्त होऊ लागली.भाजप-शिवसेना युती अनेक वर्षांपासून राहिली. २०१४ साली विधानसभा निवडणुकीत युती तुटल्यानंतर परत सत्तेसाठी ती झाली. यानंतर २०१७ साली महापालिका निवडणुकीत ऐनवेळी दोन्ही पक्ष स्वतंत्र लढले. शिवसेनेला ऐनवेळी बसलेल्या धक्क्यामुळे उमेदवारदेखील मिळाले नाहीत. युतीमुळे शिवसेनेला शहरात पक्षाचे जुने चिन्ह धनुष्यबाण पोहोचवता आले नाही व जागाही बोटावर मोजण्या इतक्यात मिळाल्या. भाजपचा बालेकिल्ला म्हणून उदयास आलेल्या उपराजधानीत मनभेद दूर करणे, मशाल चिन्ह पोहोचवणे व दोनअंकी नगरसेवक निवडून आणण्याचे आव्हान पक्षासमोर आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाप्रमाणे (शप) ठाकरे गटाने धडा शिकून स्वबळाची तयारी सुरू केली. २०२२ साली महाआघाडी असतानादेखील स्वबळाचे प्रयत्न झाले त्यावेळी पक्षात फूट पडलेली नव्हती. दरम्यान, निवडणूक टळली आणि सुरत, गुवाहाटी असा दुसऱ्या गटाचा प्रवास झाला.शिवसेनेने गेल्यावेळी संघटनात्मक बदल करताना दोन महानगर प्रमुख दिले. त्यापूर्वी जिल्हाप्रमुख असे पद होते. शहरात दोन नेतृत्वांमध्ये तीन-तीन विधानसभा मतदारसंघ असे विभाजन करण्यात आले. दक्षिण नागपूरवरून प्रमोद मानमोडे व किशोर कुमेरिया यांच्यात रस्सीखेच झाली. अखेर मानमोडे यांच्याकडे हा मतदारसंघ आला.ठाकरे गटातून मोठ्या प्रमाणात आउटगोइंग झाले असले तरी, बऱ्यापैकी शिवसैनिक आजही पक्षासोबत आहेत. मध्यंतरी असणारी अस्वस्थता आता दूर होत आहे. मात्र, संघटनेत एकच महानगर प्रमुखपद असावे, अशी शिवसैनिकांची भावना आहे. हा नवा वाद स्थानिक पातळीवर उद्भवल्याने आता मुंबईत मातोश्रीला याची कल्पना द्यावी लागेल. संपर्कनेते भास्कर जाधव, सचिव विनायक राऊत आदी नेते हा तिढा कसा सोडवतात याकडे शिवसैनिकांचे लक्ष लागले आहेपक्षाने अलीकडेच माजी जिल्हाप्रमुख व पूर्व विदर्भाचे सहसंघटक सतीश हरडे यांची महानगर संपर्क प्रमुखपदी नियुक्ती केली. त्यांनी लगेच समन्वयक साधण्यासोबतच प्रभाग, शाखाप्रमुख नाही तिथे नियुक्ती सुरू केली. आधी नियुक्त झालेल्यांना कामाला लावले. उपविभाग प्रमुख व अन्य पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांसाठी यादी तयार केली जात आहे. अर्थात मुंबईतून घोषणा होईलपक्षाकडून प्रभाग आणि शाखाप्रमुखांची बांधणी सुरू झाली आहे. गेल्या निवडणुकीत शिवसेनेचा मतटक्का वाढला. चौदा जागांवर आम्ही दुसऱ्या स्थानावर होतो. किशोर परातेंसारखे तीन उमेदवार अल्प मतांनी पराभूत झाले. त्यामुळे महाआघाडीत सन्मानजनक जागा मिळाव्यात, अशी आमची अपेक्षा आहे. अन्यथा, स्वबळावर लढण्याची आमची तयारी राहील. अर्थात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसारच निवडणूक लढण्यात येईल, असे नागपूर लोकसभा संपर्क प्रमुख सतीश हरडे यांनी सांगितले.


# ३० हजार कोटींची लढाई! करिश्मा कपूरने एक्स पती संजयच्या संपत्तीत मागितला हिस्सा?

## उद्योगपतीच्या आईचे आरोप



मुंबई - बॉलिवूड अभिनेत्री करिश्मा कपूरचा एक्स पती संजय कपूरचं १२ जून २०२५ रोजी निधन झालं. संजयला लंडनमध्ये तो पोलो खेळत असताना हृदयविकाराचा झटका आला. १९ जून रोजी दक्षिण दिल्लीतील लोधी रोड स्मशानभूमीत कुटुंब आणि जवळच्या मित्रांच्या उपस्थितीत संजय कपूरचे अंत्यसंस्कार करण्यात आले.आता संजय कपूरच्या मृत्यूनंतर असा प्रश्न उपस्थित राहतो की, त्याच्या ३० हजार कोटींच्या साम्राज्याची जबादारी कोण घेणार? याबद्दल बरेच वाद आहेत. दरम्यान, करिश्माने कंपनीकडून तिचा हिस्सा मागितल्याचं सांगण्यात येत आहे.मात्र, करिश्माने अद्याप व्यावर प्रतिक्रिया दिली नसली तरी संजयच्या आईच्या पत्रानंतर संजयची कंपनी सोना कॉमस्टारला आधीच धक्का बसला आहे.संजयच्या मृत्यूनंतर, त्याची आई राणीने दावा केला की, तिचा सोना ग्रुप आणि त्याच्याशी संबंधित आलिशान संपत्तीत मोठा हिस्सा आहे. पण अशातच तिनं शेअरहोल्डर्सना एक पत्र देखील शेअर केलं, ज्यामध्ये दावा केला आहे की, तिच्या मुलाच्या मृत्यूच्या शोकात तिला काही कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यास भाग पाडण्यात आलं. तिच्या पत्रात असं म्हटलं आहे की, मला सांगण्यात आलं आहे की, काही लोक स्वतःला कंपनीचे सर्वात मोठे शेअरहोल्डर्स असल्याचा दावा करत आहेत कारण ते कंपनी कुटुंबासारखी असल्याचा दावा करतात. मला खात्री आहे की, माझ्या मुलाच्या मृत्यूनंतर, मानसिक आणि भावनिकदृष्ट्या कमकुवत अवस्थेत, माझ्यावर दबाव आणण्यात आला आणि तयार केलेल्या कागदपत्रांचा गैरवापर केला जात आहे.दरम्यान, करिश्माने २००३ मध्ये संजय कपूरसोबत लग्न केलं. पण, त्यांचा २०१६ मध्ये घटस्फोट झाला. करिश्माने संजय आणि त्याच्या आईवर घरगुती हिंसाचाराचा आरोप केला होता. त्याचबरोबर, संजयने अभिनेत्रीवर पैशासाठी लग्न केल्याचा आरोप केला होता. करिश्माला घटस्फोट दिल्यानंतर संजयने त्यांच्या मुलांसाठी १४ कोटी रुपये बाँडमध्ये गुंतवले होते, ज्याचं वार्षिक व्याज १० लाख रुपये मिळत होते.

# दोघे खेळायला गेले ते परतलेच नाहीत; कुटुंबाकडून शोध, चिमुरड्यांच्या चपला खड्ड्याजवळ दिसल्या अन्...



नागपूर: खेळता - खेळता खड्ड्यातील पाण्यात बुडून दोन आठ वर्षीय मुलांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ही धक्कादायक घटना रामटेक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तुमसर मार्गावरील बिजेवाड्यातील पाचगाव परिसरात घडल्याची माहिती आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे. या दोघांच्या मृत्यूने कुटुंबावर दु:खाचा मोठा डोंगर कोसळला आहे.उत्कर्ष लोकेश लांजेवार (वय वर्ष ८) आणि रेहान संजय सहारे (वय वर्ष ८, दोन्ही राहणारे पाचगाव) अशी मृतकांची नावं आहेत. या प्रकरणी अधिक प्राप्त माहितीनुसार, शनिवारी (२६ जुलै) दुपारी २ वाजताच्या सुमारास हे आठ वर्षांचे दोन चिमुरडे, घरापासून १५० मीटर अंतरावर खेळायला गेले. खेळता खेळता दोघेही मुरूम काढण्यासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यातील पाण्यात पडले.पाण्यात पडल्याने या खड्ड्यात बुडून या दोघांचा मृत्यू झाला. दरम्यान, सायंकाळ झाल्यानंतरही दोघे घरी परतले नाही. त्यामुळे पालक आणि नातेवाइकांनी दोघांचाही शोध सुरू केला. तेव्हा मुरूम काढण्यासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्याजवळ या दोघांच्याही चपला नातेवाइकांना दिसल्या. पोहणारे पाण्यात उतरले असता दोघांचेही मृतदेह एकमेकांच्या अंगावर आढळून आले.या दोघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. दरम्यान, एका नागरिकाने रामटेक पोलिसांना याबाबतची माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांचा ताफा तात्काल घटनास्थळी पोहोचला. पोलिसांनी पंचनामा करून दोघांचेही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हॉस्पिटलकडे रवाना केले. रविवारी (२७ जुलै) दुपारी दोघांच्याही पार्थिवावर अत्यंत शोकाकुल वातावरणात अत्यंसंस्कार करण्यात आले.हे दोघेही एकुलते एक मुलं होते. दोघेही नातेवाइक होते. लोकेश आणि रेहान दोघेही एकलकुते एक मुलं होते. उत्कर्ष आणि रेहानच्या मृत्यूने लांजेवार व सहारे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. नातेवाइक शोकमग्न असून गावात एकच शोककळा पसरली आहे.

# पत्र लिहून वाद निर्माण करू नये, काही असेल तर..; फडणवीसांच्या मंत्र्यांना कानपिचक्या....

**नागपूर :** कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यात बैठक घेण्यावरून निर्माण झालेल्या वादावर पहिल्यांदाच बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्र्यांनी आपसात बोलाव आणि त्यानंतरही काही अडचण असेल तर मला येऊ सांगाव. त्यातील अडचणी दूर करता येईल. अशाप्रकारे पत्र लिहून वाद निर्माण करू नये अशा शब्दात मंत्र्यांना कानपिचक्या दिल्या. दरम्यान त्याचवेळी राज्यमंत्र्यांना बैठका अधिकार नाही असे मानणे चुकीचे आहे असे स्पष्ट करत मंत्री आणि राज्यमंत्र्यांनी सामंजस्य दाखवण्याचा सल्ला यावेळी दिला.मुख्यमंत्री फडणवीस रविवारी नागपूर दौऱ्यावर असताना एका कार्यक्रमानंतर प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी फडणवीस यांनी कॅबिनेट आणि राज्यमंत्री शासनाने भाग आहेत. सर्व अधिकार कॅबिनेट मंत्र्यांकडे असतात. मंत्री जे अधिकार देतात ते राज्यमंत्र्यांचे अधिकार असतात. यात कुठलाही संशय नाही. मात्र, त्यामुळे राज्यमंत्र्यांना बैठका घेण्याचे अधिकार नाही अशे मानणे चुकीचे आहे. राज्यमंत्र्यांना बैठका घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. पण अशा प्रकारच्या बैकांमध्ये धोरणात्म निर्णय होत असतील, तर ते मंत्र्यांशी बोलल्याशिवाय घेऊ नये किवा घेतल्या तर मंत्र्यांची मान्यता घेतली पाहिजे असेही फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी मंत्री आणि राज्यमंत्री यांनी सामंजस्य दाखवले पाहिजे. काही अडचणी असतील तर माझ्याशी बोलले पाहिजे अशी सूचनाही



मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. उद्धव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी राज ठाकरे मातोश्रीवर गेले ही अत्यंत आनंदाची बाब आहे. त्यामुळे आमच्याही उद्धव ठाकरेंना शुभेच्छा आहेत. वाढदिवसाच्या दिवशी शुभेच्छा द्यायला जाणे यात राजकारण पाहणे योग्य नाही असेही फडणवीस यावेळी म्हणाले. यावेळी उद्धव ठाकरेंच्या महाराष्ट्राच्या मनता काय हे दिसेलच याबद्दल विचारले असता फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रातल्या मनातलं काय आहे, हे तुम्हाला विधानसभेच्या निवडणुकीत दिसलं आणि महाराष्ट्राच्या मनात काय आहे, हे तुम्हाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ही दिसेल. मात्र, काही पक्षाच्या नेत्यांच्या मनात काय आहे, हे महाराष्ट्राच्या मनातलं आहे असे म्हणणे योग्य नाही हे फार मोठे स्टेटमेंट होईल असेही फडणवीस म्हणालेयावेळी पुण्यातील रेव्ह पार्टीबद्दल विचारले अशता फडणवीस म्हणाले, या रेव्ह पार्टीची माहिती माध्यमातूनच मिळाली. सकाळपासून विविध कार्यक्रमांमध्ये असल्याने याबद्दल नेमके ब्रिफींग घेता आले नाही. मात्र, जे माध्यमात दिसले त्यावरून पुणे पोलिसांनी रेव्ह पार्टी उधळून लावली. त्यात काही सापडले आहे. त्यामध्ये काही ड्रग्स सापडले असे कळले. पोलिस अधिकाऱ्यांकडून पूर्ण माहिती घेऊन त्यावर बोलता येईल असेही त्यांनी स्पष्ट केले

## नवा आहे पण छावा आहे... आयुष म्हात्रेने मोडला वैभव सूर्यवंशीचा मोठा विक्रम, ठरला वेगवान शतकवीर....




आयुष म्हात्रेने आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी करत सर्वांची मनं जिंकली होती. रोहित शर्मानेही सर्वांसमोर त्याची स्तुती केली होती. या आयपीएलमध्येच वैभव सूर्यवंशीसारखा युवा तारा चमकला होता. वैभवने सर्वात जलद शतक झळकावले होते. पण आता वैभव सूर्यवंशीचा हा विक्रम आयुष म्हात्रेने मोडला आहे. त्यामुळे आता यापुढे सर्वात जलद शतकवीराचा विक्रम आता आयुष म्हात्रेच्या नावावर झाला आहे.मुंबईच्या आयुष म्हात्रेने इंग्लंडच्या १९ वर्षांखालील संघाविरुद्धच्या क्रिकेट कसोटीत वैभव सूर्यवंशीचा विक्रम मोडला. त्याने गुरुवारी ६४ चेंडूत शतक करताना वैभवचा ६८ चेंडूत शतक करण्याचा विक्रम मोडला. त्यामुळे आयुष आता युवा कसोटीतील सर्वात वेगवान शतकवीर झाला आहे.

आयुषने ८० चेंडूंतच १२६ धावा केल्या. त्यात १३ चौकार आणि ६ षटकारांचा समावेश होता. या १८ वर्षीय फलंदाजाने ६४वा चेंडू खेळताना ॲलेक्स ग्रीन याला षटकार मारून शतक पूर्ण केले होते. त्याच ग्रीनने वैभवला दोन्ही डावांत बाद केले. १८ वर्षीय आयुषने गत वर्षी ऑस्ट्रेलियात युवा कसोटी पदार्पणात शतक केले होते. दरम्यान, या कसोटीत इंग्लंडने भारतास विजयासाठी ३५५ धावांचे आव्हान दिले होते. पावसाची शक्यता लक्षात घेऊन कर्णधार आयुषने फटकेबाजी सुरू केली होती. वैभव भोपळा फोडू शकला नाही. भारताला ६ बाद २९० एवढीच मजल मारता आली. वैभवने

आयुषने या मालिकेत दोन कसोटीतील डावात दोन शतक आणि एका अर्धशतकासह ३४० धावा केल्या. विहान मल्होत्राने २७७ धावा केल्या. आदित्य रावत आणि आर. अंबरीशने प्रत्येकी सहा फलंदाज बाद केले.भारताचा युवा संघ इंग्लंडमध्ये दमदार कामगिरी करत असल्याचे पाहायला मिळत आहे. सध्याच्या घडीला भारताचा युवा मुलांचा संघ, महिलांचा संघ आणि पुरुषांचा संघ इंग्लंडमध्येच आहेत. भारतीय महिलांनी वनडे मालिकेत काही दिवसांपूर्वीच इंग्लंडवर मात करत मालिका जिंकली होती. युवा मुलांचा संघही चांगली कामगिरी करताना दिसत आहे. पण शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली मात्र भारताच्या पुरुष संघाची कामगिरी मात्र चांगली होऊ शकलेली नाही. कारण या मालिकेत ते १-२ असे पिछाडीवर आहेत आणि चौथा सामनाही त्यांच्या हातून निसटू शकतो, असे सध्याच्या घडीला म्हटले जात आहे.

## शहापूर हादरलं! आईला लेकी झाल्या नकोश्या, जेवायला दिलं अन्..


### तीन सख्ख्या बहिणींसोबत काय घडलं?




**ठाणे:** शहापूर तालुक्यात तीन अल्पवयीन बहिणींच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाला कलाटणी मिळाली असून या मुलींच्या आईनेच जेवणातून तणनाशक औषध देऊन त्यांची हत्या केल्याची बाब ठाणे ग्रामीण पोलिसांच्या चौकशीमध्ये निष्पन्न झाली आहे. पोलिसांनी या आईला अटक केली आहे.दहा, आठ आणि पाच वर्षांच्या तीन सख्ख्या बहिणींचा मृत्यू झाल्याप्रकरणी, आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मुलींना जेवणातून विषबाधा झाली, मात्र आईला काहीच त्रास न झाल्याने मुलींचे वडील, नातेवाईकांनी आईवर संशय व्यक्त केला होता. यानंतर सपोनि नितीन खैरनार यांनी चौकशी केली असता, मुलींच्या आईनेच हत्या केल्याची बाब उघड झाली. ही महिला आयुष्याला कंटाळली होती. मुलींच्या खर्चाचा ताण, त्यांना सांभाळण्याचा कंटाळा आल्याने तिने तणनाशक औषध जेवणातील वरणात मिसळले.मुलींच्या आईनेच मुलींना जेवणातून तणनाशक औषध देऊन त्यांची हत्या केल्याची बाब ठाणे ग्रामीण पोलिसांच्या चौकशीमध्ये निष्पन्न झाली आहे. पोलिसांनी आरोपी महिलेला अटक केली आहे. मुलींच्या खर्चाच्या ताणामुळे त्रस्त झाल्याने आणि मुलींना सांभाळण्याचा कंटाळा आल्याने तिने मुलींचा जीव घेतला. न्यायालयाने तिला ३१ जुलैपर्यंत पोलिस कोठडी दिली आहे. शहापूर तालुक्यातील एकाच कुटुंबातील १० , आठ आणि पाच वर्षांच्या तीन सख्ख्या बहिणींचा विषबाधेने मृत्यू झाल्याप्रकरणी, आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती.

# खडसेंच्या जावयाचा ठरवून गेम? तीनपर्यंत चालणारा पब वेळेत बंद का, प्रकरण बनावट, वकिलांचा खळबळजनक दावा..

**पुणे** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार आणि माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई डॉ. प्रांजल खेवलकर यांना ड्रग पार्टी प्रकरणात अटक केल्यानंतर पुणे पोलिसांनी त्यांच्या हडपसरमधील बंगल्यावर रविवारी छापा टाकला. या छाप्यात लॅपटॉप, हार्डडिस्क व अन्य इलेक्ट्रॉनिक वस्तू जप्त करण्यात आल्या.शनिवारी पहाटे खराडीतील स्टेबर्ड अझुर सूट हॉटेलमध्ये सुरू असलेल्या ड्रग पार्टीवर गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाने छापा टाकून सात जणांना अटक केली होती. यामध्ये डॉ. खेवलकरांसह, श्रीपाद यादव व निखिल पोपटाणी यांच्यासह समीर सय्यद, सचिन भोंबे आणि इशा सिंग व प्राची शर्मा यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून कोकेन, गांजा, दारूच्या बाटल्या, हुक्का पॉट असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. प्रांजल खेवलकर, पोपटाणी, सय्यद, यादव, भोंबे, सिंग आणि शर्मा यांची ओळख आधी झाली होती. यानंतर ते एकमेकांच्या संपर्कात आले. पोपटाणी हा सिगारेट वितरक आहे. सय्यदचा हार्डवेअरचा व्यवसाय आहे. यादव हा बांधकाम व्यावसायिक आहे. हे सर्व यापूर्वीही अशा पार्टी आयोजित करीत होते का, याचा तपास सुरू आहे. पोलिसांनी न्यायालयात म्हटले की, आरोपींना अमली पदार्थ कुठून मिळाले, त्यांनी हे पदार्थ सेवनासाठी ठेवले होते की विक्रीसाठी, त्यांचा अमली पदार्थ तस्करी करणाऱ्या टोळ्यांशी संबंध आहे का, याबाबत चौकशी गरजेची आहे.हॉटेलच्या परिसरात तीन तरुणी दिसल्या होत्या; परंतु काही वेळातच त्या निघून गेल्या. त्या नेमक्या कोण होत्या? त्या पार्टीसाठीच आल्या होत्या का, याचा तपास सध्या सुरू आहे. कोरेगाव पार्क-मुंढवा रस्त्यावरील एका पंचतारांकित हॉटेलमधील नामांकित पब एरवी पहाटे तीनपर्यंत सुरू ठेवला जातो. मात्र, शनिवारी मध्यरात्री दीड वाजताच पोलिसांनी बंद करायला भाग पाडले. पोलिसांच्या या कृतीवर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. डॉ. खेवलकर आणि त्यांच्या सोबतचे लोक त्या पबमध्ये होते, अशी माहिती सूत्रांनी दिली. हा पब बंद झाल्यानंतर ते खराडी येथील हॉटेलमध्ये गेले.





ड्रग पार्टीच्या आधी संबंधितांनी कल्याणीनगरमधील एका पबमध्ये आणि दुसऱ्या एका हॉटेलमध्ये पार्टी केल्याची माहिती पोलिसांनी दिली. मात्र, पब आणि हॉटेल वेळेत बंद झाल्यामुळे शेवटी स्टेबर्ड अझुर सूट हॉटेलमध्ये पार्टी झाली.ड्रग्ज पार्टी म्हणजे बालिशपणा वाटतो. एका फ्लॅटमध्ये जमल्यावर त्याला रेव्ह पार्टी म्हणता येणार नाही. खेवलकर यांनी कोणत्याही प्रकारचा अमली पदार्थ सेवन केला नाही, हे रक्त तपासणी अहवाल आल्यानंतर स्पष्ट होईल, असा दावा डॉ. खेवलकर यांचे वकील ॲड. विजयसिंह ठोंबरे यांनी न्यायालयात केला. खेवलकर यांच्यावर पूर्वनियोजित पद्धतीने दोन वेळा ट्रॅप रचले गेले होते. संपूर्ण प्रकरण बनावट आहे, असा दावाही त्यांनी केला.

# मंत्रालयात आता ऑफलाइन प्रवेश बंद; डिजिप्रवेश १ ऑगस्टपासून अनिवार्य....

**मुंबई** : राज्य सरकारकडून मंत्रालयात प्रवेशासाठी जुन्या पद्धतीने दिला जाणारा ऑफलाइन प्रवेश यापुढे बंद करण्यात येणार आहे. येत्या एक ऑगस्टपासून मंत्रालयातील प्रवेशासाठी डिजिप्रवेश ही ऑनलाइन प्रक्रिया अनिवार्य केली जाणार आहे. या संदर्भातील सूचना मंत्रालयातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना देण्यात आली असून, त्याशिवाय सर्व मंत्री कार्यालयांतही याबाबतची सूचना देण्यात आल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी शुक्रवारी दिली.राज्य सरकारने काही दिवसांपूर्वी मंत्रालयातील प्रवेशासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी ङ्गफेस रेकग्नायझेशनफ प्रणालीला सुरुवात केली होती. या प्रणालीची अंमलबजावणी सुरू केल्यानंतर मंत्रालयात यापुढे अभ्यागतांना प्रवेशासाठी नवी प्रणाली सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा राज्य सरकारने केली होती. त्यानुसार आता मंत्रालयातील प्रवेशासाठी डिजिप्रवेश ही नवी ऑनलाइन प्रक्रिया या वर्षाच्या सुरुवातीपासून लागू करण्यात आली आहे. आता डिजिप्रवेश ऑनलाइन प्रणालीच्या



माध्यमातूनच अभ्यंगताना प्रवेश दिला जाणार आहे. जुनी पद्धत पूर्णपणे मोडित काढण्यात येणार असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली. ही प्रक्रिया एक ऑगस्टपासून सक्तीची केली जाणार आहे.डिजिप्रवेश ही एक आधार क्रमांकांसोबत संलग्न केलेली ऑनलाइन प्रणाली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून मंत्रालयात ज्या विभागात भेट द्यायची आहे किंवा ज्या अधिकाऱ्यांच्या भेटण्याकरिता जायचे आहे, त्याबाबतची सर्व माहिती या प्रणालीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्याशिवाय ही ऑनलाइन प्रक्रिया राबविताना अभ्यागतांची चेहरा पडताळणीही पूर्ण केली जाणार आहे. या प्रणालीच्या माध्यमातून १० सेकंदांत चेहरा पडताळणी पूर्ण केली जाणार आहे. त्याशिवाय क्यू आर कोडही उपलब्ध करून दिला जाणार आहे. या प्रणालीमुळे अभ्यागतांना भेटीसाठी लागणारा वेळही वाचणार आहे.विधान भवनात काही दिवसांपूर्वीच आमदार समर्थकांमध्ये हाणामारी झाली होती. याचे पडसाद राज्यभरात उमटल्यानंतर आता विधान भवनातही ङ्गफेस रिकग्नायझेशनफ प्रणाली सुरू केली जाण्याची चाचपणी केली जाणार असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांकडून देण्यात आली. मंत्रालयाप्रमाणेच ही प्रक्रिया राबविण्यात येऊ शकते का, याबाबत सध्या चर्चा सुरू असल्याची माहिती या वेळी देण्यात आली.

# सूरज चव्हाण यांच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता,

**मुंबई** : राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांच्या अडचणी काही केल्या कमी होताना दिसत नाहीत. सूरज चव्हाण यांनी छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना मारहाण केल्यामुळे त्यांना प्रदेशाध्यक्ष पदावरुन पायउतार व्हावं लागलं. एवढंच नाही तर त्यांना पक्षातून देखील काढून टाकण्यात आल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे सूरज चव्हाण यांच्या अडचणी वाढवणारी आणखी एक बातमी समोर येत आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सूरज चव्हाण यांच्या विरोधात कोर्टात मानहानी दावा दाखल केला आहे. या प्रकरणी उद्या कोर्टात सुनावणी होणार आहे. स्वत: दमानिया यांनी ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे सूरज चव्हाण यांना मी धडा शिकवणारच, असा निर्धार मी केला होता. त्यांनी मुद्दामहून माझ्याविरुद्ध सातत्याने खालच्या दर्जाची वक्तव्ये केली. खूप खूप संताप आला, म्हणून त्यांच्या विरोधात मी दावा दाखल केला आहे. उद्या वांद्रे कोर्टात, सकाळी ११ वाजता या केसची सुनावणी होणार आहेङ्कङ्क, असं अंजली दमानिया म्हणाल्या आहेत. अंजली दमानिया यांनी आपल्या ट्विटसोबत एका वृत्तवाहिनीला दिलेल्या जुन्या मुलाखतीची लिंक देखील शेअर केली आहे. यामध्ये त्यांनी सूरज चव्हाण यांना धडा शिकवणार असं म्हटलं होतं.प्रत्येक पक्षाने आणि नेत्यांनी असे राम आणि शाम लोकं ठेवलेली आहेत. म्हणजे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात बोललं की भाजपचे प्रवीण दरेकर आणि प्रसाद लाड बाहेर येतात आणि ताबोडतोब बोलायला सुरुवात करतात. तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल तुम्ही चकार शब्द जरी काढला तरी अमोल मिटकरी आणि सूरज चव्हाण हे वाट्टेल ते बोलतात. त्यांना बोलायचं ताडतंत्र नाही. विशेषत: सूरज चव्हाण यांना नाहीङ्कङ्क, असं अंजली दमानिया म्हणाल्या होत्यामिटकरी माझ्याबद्दल आतापर्यंत तसं वाईट बोलले नव्हते. त्यांनी फक्त सांगितलं की, बाहेर जातात की ह्यांच्याकडे पैसे कुठून येतात? त्यांनी कदाचित गुगल केलं असेल. पण सूरज चव्हाण यांचा इतका संताप येतो. आता ह्यांना सरळ करायचं आहे. ह्यानाच नाही तर तर ह्यांच्या मालकांना सरळ करायचं आहे. मी किती तत्ववान आहे हे अजित पवार, सुनील तटकरे, छगन भुजबळ या सर्वांना माहिती आहे. पण हे सूरज चव्हाण यांना युवा मोर्चातून काहीतरी दाखवायचं असेल. मी तुमच्यासाठी लढतोय दादा हे त्यांना दाखवायचं असेल. आता मला रितसर धडा शिकवायचा आहेङ्कङ्क, असा इशारा अंजली दमानिया यांनी दिला होता.

# पाझर तलाव ओव्हरफ्लो फुटण्याच्या भीतीने नागरिक धास्तावले !

**जनसंचलन/ वरोडी**

गावाच्या उत्तरेला सुमारे अर्धा किलोमीटर अंतरावर असलेला पाझर तलाव सध्या ओसंडून वाहण्याच्या त्याच्या स्थितीत असून, संरक्षणाची तातडीने गरज असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. गेल्या काही सुरु दिवसांपासून असलेल्या मुसळधार पावसामुळे तलाव पूर्ण क्षमतेने भरलेला आहे. पाण्याचा साठा इतका वाढला आहे की, तलावाच्या भिंतीवर करण्यात आलेले दगडी पिचिंग पूर्णतः झाकले गेले आहे. तलावातील पाणी सांडण्यासाठी असलेला सांडवा तुलनेने उंच असल्यामुळे पाण्याचा योग्यप्रकारे निचरा होत नाही. परिणामी, शक्यता पाण्याचा दाब थेट भिंतीवर येत असून, त्यामुळे संभाव्य धोक्याची स्थिती निर्माण झाली आहे. तलावाच्या मुख्य भिंतीवर मोठ्या प्रमाणात झाडे उगवलेली असून, ती भिंतीच्या मजबुतीसाठी धोकादायक ठरू शकतात. ग्रामस्थांच्या मते, पावसाचा जोर असाच कायम राहिला, तर तलाव फुटण्याची नाकारता येणार नाही. त्यामुळे तलावाखालील शेती आणि वस्तीला गंभीर धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. परिस्थितीच्या गांभीर्यामुळे ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित जलसंधारण किंवा सिंचन विभागाने तातडीने लक्ष घालून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# लोणार, मेहकरात वार्षिक सरासरीच्या ६० टक्के पाऊस

## चार तालुक्यांत दमदार पाऊस, पाच मंडळांमध्ये अतिवृष्टी

**जनसंचलन/ लोणार**

पावसाळ्यात आतापर्यंत सरासरीच्या ४२.५० टक्के पावसाची नोंद झाली आहे. मात्र, लोणार आणि मेहकर तालुक्यांनी ६० टक्क्यांच्या पुढे आघाडी घेतली आहे. दुसरीकडे बुलढाणा, चिखली आणि अन्य काही तालुक्यांमध्ये अद्यापही पावसाने पन्नाशीचा टप्पा पार केलेला नाही. पावसाचे हे असमान आगमन शेतीच्या दृष्टीने चिंता वाढवणारे आहे. जिल्ह्याचे एकूण सर्वसाधारण वार्षिक पर्जन्यमान ७६१.६ मिमी असून, आतापर्यंत ३२३.७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. यंदाच्या पावसाळ्यात लोणार तालुक्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली असून, येथे ६२.३८ टक्के पर्जन्यमान पूर्ण झाले आहे. अतिवृष्टीमुळे या भागात काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले असून, शेतीच्या कामांनाही गती मिळाली आहे. जिल्ह्यातील पावसाचे आकडे पाहता तालुकानिहाय मोठा फरक दिसून येतो. जिल्ह्याच्या ७६१.६ मिमी या वार्षिक सरासरीच्या तुलनेत आतापर्यंत सरासरी ४२.५० टक्के पावसाची नोंद झाली आहे. त्यातही लोणार तालुक्यात सर्वाधिक ६२.३८ टक्के म्हणजेच ५४४.३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मेहकर (६१.७०%), देऊळगाव राजा (५९.४५%) आणि सिंदखेडराजा (५२.८०%) या तालुक्यांमध्येही पाऊस समाधानकारक झाला आहे. मात्र, बुलढाणा (३६.७३%), चिखली (४४.९९%), खामगाव (३४%), शेगाव (४३.२१%) आणि जळगाव जामोद (३५.३२%) तालुक्यांत मध्यम पावसाची नोंद आहे. दुसरीकडे संग्रामपूर (२५.९५%), नांदुरा (२७.१४%), मोताळा (२९.२०%) आणि मलकापूर (३३.६१%) या तालुक्यांमध्ये अत्यल्प पाऊस झाला असून, या भागांमध्ये अजूनही समाधानकारक पावसाची प्रतीक्षा आहे. खरीप हंगामासाठी ही परिस्थिती गंभीर ठरू शकते. त्यामुळे आगामी काही दिवसांतील पावसावर संपूर्ण शेती अवलंबून आहे

---

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतली आत्महत्याग्रस्त शेतकरी स्वर्गीय गणेश थुट्टे यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट ...

# टोकाची भूमिका घेऊ नका...शेतकऱ्यांना केले आवाहन...

**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज चिखली तालुक्यातील भरोसा येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी दांपत्याच्या घरी सांत्वनपर भेट देऊन .. या शेतकरी कुटुंबीयांना धीर दिला. शेतकरी बांधवांनो टोकाची भूमिका घेऊ नका अस आवाहन त्यांनी यावेळी केल चिखली तालुक्यातील भरोसा येथील शेतकरी गणेश श्रीराम थुट्टे (वय ५५) आणि त्यांच्या पत्नी रंजना गणेश थुट्टे (वय ५०) यानी शेतकरी दांपत्याने गत आठवड्यात गळफास घेवून आत्महत्या केली या दांपत्याच्या आत्महत्येचं कारण हे हुमणी अळीचा प्रादुर्भाव शेतीतील पिकावर वाढल्याने पीक नष्ट झाली .त्यामुळे कर्जाचा बोजा वाढत असल्याने या शेतकरी दांपत्याने टोकाचे पाऊल उचल . या संदर्भाची माहिती केंद्रीयमंत्री तथा बुलडाणा लोकसभा मतदार संघाचे खासदार प्रतापराव जाधव यांना समजली . सध्या अधिवेशन सुरू असल्यामुळे ते शनिवारी मेहकर येथे घरी आलेले असतांना त्यांनी आज २७ जुलै रोजी रविवारला चिखली तालुक्यातील भरोसा येथे स्वर्गीय गणेश श्रीराम थुट्टे घरी जावुन सांत्वनपर भेट घेतली त्यांच्या कुटुंबीयांना धीर देत शासनातर्फे सर्वतोपरी मदत मिळवून देण्याची ग्वाही दिली ... निसर्गाचा प्रकोप झाला तरीही शेतकऱ्यांनी खचून जावु नका.. सरकार तुमच्या पाठीशी आहे . असे टोकाचे पाऊल उचलू नका .. अस आवाहन त्यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना केलं यावेळी त्यांच्यासोबत शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबुराव मोरे तालुकाप्रमुख गजानन मोरे संतोष भुतेकर राजू पाटील बाबुराव हाडे पंजाबराव जावळे अनमोल ढोरे विष्णू घुबे यांच्यासह अन्य पदाधिकारी ग्रामस्थ तसेच कृषी आणि महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते

# सहकारी संस्था निवडणूक अधिकाऱ्यांचे तयार करणार पॅनल !

**जनसंचलन/बुलढाणा**



जिल्ह्यातील ई वर्गातील सहकारी गृहनिर्माण संस्था (२५० किंवा त्यापेक्षा कमी सदस्यसंख्या असलेल्या) निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे पॅनेल तयार करण्यात येणार आहे. यासाठी पात्र उमेदवारांकडून २१ ऑगस्टपर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांनी दिली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अर्ज करण्यासाठी शासकीय विभागातील किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील कार्यरत वरिष्ठ लिपिक किंवा त्यावरील पदावरील अधिकारी-कर्मचारी, प्रमाणित लेखापरीक्षक, वकील तसेच शासकीय किंवा निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेले (वय ६५ वर्षापेक्षा कमी असलेले) अधिकारी पात्र आहेत. विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. तसेच, अर्जाचे नमुने कार्यालयीन नोटीस बोर्डवरही पाहायला मिळतील. हे पॅनेल तयार केल्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका वेळेत, सुयोग्य व पारदर्शकपणे पार पाडता येणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज विहित वेळेत संबंधित कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले.

---

# पेनटाकळी प्रकल्पात ७१ टक्के जलसाठा वक्रद्वारे उघडण्याची शक्यता!...

**जनसंचलन/मेहकर**

मुसळधार पावसामुळे पेनटाकळी धरणात ७१.८३ टक्के जलसाठा उपलब्ध झालाय. त्यामुळे पूर नियंत्रणासाठी धरणाची वक्रद्वारे उघडून पैनगंगा नदीमध्ये विसर्ग सोडावा लागण्याची शक्यता असल्याने धरणाच्या काठावरील गावातील नागरिकांना खबरदारी घेण्याची गरज निर्माण झाली आहे.याबाबत सरपंच व सचिवांना मेहकर येथील पेनटाकळी प्रकल्प व्यवस्थापन उपविभागीय अधिकारी चव्हाण यांनी खबरदारीचे निर्देश दिले आहे. गेल्या काही दिवसांपासून संत भार व मुसळधार पाऊस कोसळत असल्याने पेनटाकळी धरणात ७१.८३ टक्के पाणीसाठा २६ जुलै रोजी उपलब्ध झाला आहे.या धरणाच्या पाणलोट क्षेत्रात आणखी पाऊस झाल्यास व धरणाच्या उर्ध्व बाजूस असणाऱ्या प्रकल्पातूनपाण्याचा विसर्ग वाढल्यास धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होण्याची संभावना आहे.सदर पाण्याची आवक लक्षात घेऊन पूर्ण नियंत्रण करण्यासाठी पेनटाकळी प्रकल्पाची वक्रद्वारे उघडून पैनगंगा नदीमध्ये विसर्ग सोडावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे पैनगंगा नदीला पूर येऊ शकतो. परिणामी परिसरातील नदीकाठच्या पेनटाकळी, दुधा, ब्रम्हपुरी, रायपुर, बाहई,पाचला, भालेगाव,गौढाळा, कंबरखेड, नेमतापुर, फर्दापुर, मेहकर, सारंगपुर, अंत्री देशमुख, बोरी,सोनाटी, नांद्रा, गणपूर ता. मेहकर या १८ गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान गावाच्या सरपंच व सचिवांनी नागरिकांना मालमत्ता,वाहने जनावरे,पाळीव प्राणी व शेती



अवजारे आदी सामुग्री सुरक्षित स्थळी हलविण्याबाबत दवंडीद्वारे सुचित करावे असे, आवाहन पेनटाकळी प्रकल्प व्यवस्थापनाचे उपविभागीय अधिकारी अ. स. चव्हाण यांनी केले आहे

# खाकीच्या कर्तुत्वाला सलाम!

## पाण्यात बुडणाऱ्या मुलाचे वाचविले प्राण!

**जनसंचलन/ लोणार**

एक चिमुकला पाण्यात बुडत असल्याचे गस्तीवरून परतणाऱ्या पोलिसांना दिसले अन् त्यांनी क्षर्णाधात डोहात उडी घेऊन, पाण्याच्या प्रवाहात तो चिमुकला खोलवर जात असताना, पोलिसांनी त्वरित या मुलाला पाण्यातून सुखरूप बाहेर काढले आणि त्याचे प्राण वाचवले.या घटनेमुळे, परिसरातील नागरिकांनी पोलिसांच्या या धाडसी कार्याचे कौतुक केले आहे. लोणार शहराबाहेरील घरकुल परिसरात लोणार पोलीस स्टेशनचे बिट जमादार संतोष चव्हाण व पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर निकस हे पेट्रोलिंग साठी घरकुल परिसरात गेले होते, त्या ठिकाणा वरून पेट्रोलिंग करून परत येत असतांना त्यांना एका डोहा जवळ चिमूकला ओरडत उभा असल्याचे दिसून आले. त्यांची नजर डोहा जवळ गेली तर एक चिमुकला पाण्यात बुडतातांना निर्दर्शनास आला. क्षणाचाही विलंब न करता पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर निकस यांनी पाण्यात उडी घेऊन त्या बालकाला पाण्यातून बाहेर काढले व त्यांच्या कुटुंबियांच्या स्वाधीन केले. त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी पोलीस प्रशासनाचे आभार मानले त्यांच्या या कामगिरीमुळे त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.या घटनेवरून असे समजते की, देव तारी त्याला कोण मारी! खरच पोलीस बिट जमादार संतोष चव्हाण व अंमलदार ज्ञानेश्वर निकस हे त्या मुलाच्या साठी देवदूत ठरले आहेत, अशी भावनात्मक प्रतिक्रिया आता उमटत आहे.

**मागणीकडे लक्ष द्या!**


घरकुल परिसरातील हा पाण्याच्या डोह खूप धोकादायक आहे.भविष्यात अशी घटना परत घडू नये, या साठी प्रशासनाने उपाययोजना करावी अशी मागणी घरकुल वासी करीत आहेत. या डोहात फार मोठ्या प्रमाणात पाणी साचलेले आहे. त्यामुळे त्या परिसरातील नागरिकांनी सतर्कता ठेवावी व आपल्या चिमूकल्याकडे लक्ष ठेवावे




# अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आरोपीला तीन वर्षे सश्रम कारावास

**जनसंचलन/बुलढाणा**

तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी बुलढाणा येथील विशेष न्यायालयाने बुधवारी आरोपी अशोक समाधान मगर याला पोक्सो कायद्यान्वये तीन वर्षे सश्रम कारावास व दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. विशेष म्हणजे, या गुन्ह्यात सहभागी असल्याबद्दल न्यायालयाने आरोपीच्या आई-वडिलांनाही प्रत्येकी एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. ही घटना तालुक्यातील एका गावातील तलाव परिसरात घडली. पीडित अल्पवयीन मुलगी कपडे धुण्यासाठी गेली असताना आरोपी अशोक मगर याने तिचा विनयभंग केला. त्यानंतर मुलगी घरी आल्यानंतर आरोपीने त्यांच्या घरासमोर येऊन शिवीगाळ केली. पीडित मुलीचे वडील व आजी त्याला समजावण्यास गेले असता, आरोपीसह त्याचे वडील समाधान मगर आणि आई गीता मगर यांनी त्यांना मारहाण केली. प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. २५ फेब्रुवारी २०२० रोजी ही घटना घडली होती. सरकारी पक्षातर्फे ॲड. संतोष खत्री यांनी काम पहाले.




# २.७४ लाखांचा मुद्देमाल लंपास



**जनसंचलन/बुलढाणा**

तालुक्यातील साखळी बुद्रूक येथे अज्ञात चोरट्याने दरवाजा तोडून घरातील २ लाख ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना २३ जुलै रोजी उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी मंगेश गजानन साखळीकर यांनी बुलढाणा ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. मंगळवारी (दि. २२ जुलै) रात्री ते घरामध्ये झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने घरात घुसून घरातील २ लाख ५४ हजार रुपयांचा सोन्याचा हार व नगदी २० हजार रुपये असा २लाख ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. सकाळी ६ वाजता साखळीकर उठले असता त्यांना घरातील साहित्य अस्ताव्यस्त दिसून आले. त्यानंतर हा चोरीचा प्रकार समोर आला. प्रकरणी त्यांनी पोलिसात तक्रार दिली असून पुढील तपास बुलढाणा ग्रामीण पोलिस करत आहेत.

# आम. क्षिरसागर यांनी राजू शेट्टींवर केलेल्या आरोपाबाबत रविकांत तुपकर काय म्हणाले?

**जनसंचलन/बुलढाणा**

आमदार क्षीरसागर यांनी राजू शेट्टी यांच्यावर पाचशे एकर जमीन असल्याचा आरोप केला तर शेट्टी यांनी पाचशे एकर जमिनीचे सातबारा द्यावे, ती जमीन क्षीरसागर यांच्या नावावर बक्षीसपत्र करून देण्याचे प्रतिउत्तर दिले.दरम्यान रविकांत तुपकर यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, अनेक राजकारणी नातेवाईक किंवा ओळखीच्या लोकांच्या नावावर प्रॉपर्टी करीत असतात. राजकारणी मुरब्बी झाले. राजकारण्यांची पूर्वीची संपत्ती आणि आजची संपत्ती याचे दर पाच वर्षांनी जरी मूल्यमापन केले तर सर्व समोर येते.पब्लिक सब कुछ जानती है! अशा शब्दात तूपकरांनी मत व्यक्त केले. ते हॅलो बुलढाणा व सीटी न्यूज चॅनलच्या कार्यालयात आले असता त्यांनी चर्चा करून अनेक मुद्द्यांना हात घातला. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक रविकांत तुपकर यांना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीबाबत यावेळी प्रश्न विचारण्यात आला. तेव्हा ते म्हणाले की, क्रांतिकारी शेतकरी संघटना केवळ शेतकऱ्यांच्या समस्येसाठी लढत नाही तर जनतेच्या मूलभूत सुविधांसाठी देखील लढते.शहरातील तेलगु नगरातील रस्त्यावर खड्डे पडले होते. हा प्रश्न नगरपालिका मध्ये रेटून रस्त्यावरील खड्डे बुजवून घेतले. शहरातही आमची कामे आहेत. लोकसभा निवडणूकीत शहरातून मला साडेपाच हजार मते मिळाली. पुढे कार्यकर्त्यांची बैठक घेतली जाणार आणि निवडणूक संदर्भातील भूमिका घेतल्या जाईल,असे तूपकर म्हणाले.यावेळी त्यांनी हुमणी अळीचा हल्ला, कर्जमाफी व पिकविमा संदर्भातील सरकारच्या उदासिन धोरणावर ही भाष्य केले.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८